मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पवना धरणात 15 जूनपर्यंत पुरेल इतका पाणीसाठा

## शहरवासियांनो पाण्याचा वापर काटकसरीने करा : पाटबंधारे विभागाचे आवाहन



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची तहान भागविणाऱ्या मावळातील पवना धरणातील पाणीसाठा वाढत्या उन्हामुळे कमी होऊ लागला आहे. सध्या ६२ टक्के पाणीसाठा असून, हा पाणीसाठा १५ जूनपर्यंत पुरेल एवढा आहे. त्यामुळे पाण्याचा वापर काटकसरीने करण्याचे आवाहन पाटबंधारे विभागाने केले आहे.

शहराला मागील साडेपाच वर्षांपासून एक दिवसाआड पाणी पुरवठा सुरू आहे. शहराची लोकसंख्या वाढत असल्यामुळे पाण्याची मागणीही सातत्याने वाढू लागली आहे. मावळातील पवना धरणातून ५१०, आंद्रा धरणातून ८०, एमआयडीसीकडून २० असे ६१० दशलक्ष लीटर (एमएलडी) एका दिवसाला शहराला पाणीपुरवठा केला जात आहे. भामा आसखेड धरणातून १६७ दशलक्ष लिटर पाणी आणण्याचे नियोजन आहे. त्यासाठी जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. या कामाला वेग आला असून, डिसेंबर २०२५ अखेर या जलवाहिनीचे काम पूर्ण करण्याचा मानस महापालिका प्रशासनाचा आहे.

मागील काही दिवसांपासून शहर आणि मावळातील पवना धरण परिसरात उन्हाचा चटका वाढू लागला आहे. पाण्याची मागणी वाढण्यास सुरुवात झाली आहे. उन्हामुळे बाष्पीभवनही होत आहे. त्यामुळे धरणातील पाणी पातळी घटू लागली आहे. पवना धरणातून पिंपरी चिंचवड शहरासह महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) मावळ तालुक्यातील काही ग्रामपंचायत व नगरपरिषदेला पाणी दिले जाते. सध्या पवना धरणात ६२ टक्के पाणीसाठा आहे. शहरवासीयांना सध्यातरी पाण्याची चिंता नाही. दरम्यान, आंद्रा धरणातूनही महापालिका पाणी घेत असून, या धरणात ६५ टक्के पाणीसाठा आहे.

# आमदार अमित गोरखेंनी मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नांचा घेतला आढावा

## भोसरी, चिंचवडच्या तुलनेत पिंपरीला बजेटमध्ये निधी देण्याची माजी नगरसेवकांनी केली मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेशी सबंधित पिंपरी विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नांचा आढावा आमदार अमित गोरखे यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्याक़डून गुरुवारी (ता.१३) घेतला. महापालिका अधिकारी आणि पिंपरी मतदारसंघातील भाजपचे माजी नगरसेवक या बैठकीला उपस्थित होते. त्यावेळी माजी नगरसेवकांनी भोसरी आणि चिंचवडच्या तुलनेत पिंपरीला आगामी अर्थसंकल्पात निधी देण्याची मागणी केली. विधान परिषदेवर निवडून गेल्यानंतर आमदार गोरखे यांनी पिंपरीची अशी ही पहिलीच बैठक घेतली.

महापालिका निवडणूक झाली नसल्याने गेले ३५ महिने महापालिकेत प्रशासक राज आहे. त्यामुळे नागरी प्रश्न तातडीने सुटत नसून विकासकामेही प्रलंबित आहे. त्यासाठी आमदार गोरखेंनी ही बैठक घेतली. शहरातील दुसऱ्या विधान परिषद सदस्य उमा खापरे या परदेशात असल्याने या बैठकीला उपस्थित राहू शकल्या नाहीत.

या बैठकीत वॉर्ड तथा प्रभागनिहाय प्रलंबित समस्या मांडण्यात आल्या. त्यातील शक्य त्या लगेच सोडवतो असे आश्वासन आयुक्तांनी यावेळी दिले. माजी नगरसेवक शीतल शिंदे, राजेश पिल्ले, राजू दुर्गे, संदीप वाघेरे, चेतन



घुले, शैलेश मोरे, अनुराधा गोरखे, सुजाता पलांडे, शर्मिला बाबर, कुणाल लांडगे, कैलास कुटे, गणेश लंगोटे, आऱ.एस.कुमार, राजेंद्र बाबर, प्रदीप भोसले आदी यावेळी उपस्थित होते. या सर्वांनी भोसरी, चिंचवडच्या तुलनेत पिंपरीला बजेटमध्ये निधी देण्याची एकमुखी मागणी केली.

ज्येष्ठ माजी नगरसेवक आर.एस. कुमार यांनी निगडी-प्राधिकरणात भेडसावणाऱ्या मोकाट कुत्र्यांच्या उपद्रवाकडे यावेळी लक्ष वेधले. प्राधिकरणातील वाहतूक कोंडीचाही मुद्दा मांडला. उद्यानांची देखभाल होत नसल्याचे सांगत महापालिकेची क्षेत्रीय़ कार्यालय इमारत अपुरी पडते आहे, असे बाबर म्हणाले. संदीप वाघेरे यांनी बजेटमध्ये आपल्या प्रभागासह पिंपरी गावासाठी निधी देण्याची मागणी केली. पिंपरी कॅम्प या शहराच्या बाजारपेठेतील व्यापाऱ्यांना वाहतुकीची मोठी समस्या भेडसावत असल्याचे त्यांनी सांगितले. झोप़डपट्टी पुनर्वसनाचे (एसआरए) काम नीट होत नसल्याकडे त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. अनुराधा गोरखे यांनी शाहूनगर येथे पडून असलेल्या अडीच एकरच्या भुखंडावर नाट्यगृह उभारण्याची मागणी केली. त्यांनी सुद्धा वाहतूक कोंडीचा प्रश्न उपस्थित केला. संत तुकारामनगर येथे सुरु असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा उभारणीच्या कामाला वेग द्या, असे सुजाता पालांडे म्हणाल्या. वल्लभनगर एसटी आगाराशेजारचा मोकळा भुखंड विकसित करा, अशी सूचना त्यांनी केली.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेकडे दुर्लक्ष होत असल्याबद्दल राजेश पिल्ले यांनी खंत व्यक्त केली. ती सक्षम करण्यासाठी पीएमपएमलच्या ताफ्यात बसची संख्या वाढली पाहिजे, असे ते म्हणाले. बोपखेलवासियांच्या सोईसाठी बांधण्यात आलेल्या नव्या पुलावर दिशादर्शक फलक नसल्याने तिकडे जाणारी नव्या व्यक्तींचा गोंधळ होत आहे. त्यामुळे हे फलक तातडीने लावावेत,अशी मागणी चेतन घुले यांनी केली.

# 'पीएमपीएमएल'च्या ताफ्यात येणार हजार बस

## 'पीएमआरडीए' व पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका देणार प्रत्येकी 500 बस

**पुणे | प्रतिनिधी**

महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) ताफ्यात नव्याने एक हजार बस येणार आहेत. यामधील पाचशे बस पुणे महानगर विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) देणार असून, उर्वरित पाचशे बस पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका देणार आहेत. पीएमआरडीएच्या अंदाजपत्रकाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत बुधवारी (दि. 12) मंजुरी देण्यात आली. या बैठकीला महापालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्यासह पीएमपीएमएलचे प्रभारी अध्यक्ष पृथ्वीराज बी. पी. हे उपस्थित होते.

याबाबत माहिती देताना बी. पी. म्हणाले, पीएमपीच्या ताफ्यात सद्य:स्थितीला केवळ 2 हजार बस आहेत. आयुर्मान संपल्याने त्यामधील 300 बस कमी कराव्या लागणार आहेत. पीएमपीला 6 हजार बसची आवश्यकता आहे.



त्यामुळे पीएमआरडीएच्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी पीएमआरडीएने पीएमपीला पाचशे बस द्याव्यात, असे आदेश दिले, तर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकांनी मिळून पीएमपीला पाचशे बस द्याव्यात, असे आदेश यापूर्वीच दिले आहेत.

पीएमपी कंपनीच्या हिस्सेदारीनुसार पुणे महापालिकेने 300 तर पिंपरी चिंचवड महापालिकेने 200 बस उपलब्ध करून द्यायच्या आहेत. त्यानुसार पीएमपीसाठी एक हजार बस उपलब्ध होणार आहेत.

पीएमपीसह शहरातील सर्व वाहनचालकांसमोर आता शासनाने दिलेल्या मुदतीत आपल्या वाहनाला हायसिक्युरिटी नंबरप्लेट बसवण्याचे नियोजन सुरू झाले आहे. या नंबरप्लेट कशा बसवायच्या, कुठे बसवायच्या, ऑनलाइन अर्ज कसा करायचा, याबाबत चर्चा रंगल्या आहेत. सन 2019 पूर्वीच्या खासगी वाहनांसह सरकारी वाहनांना देखील आता हायसिक्युरिटी नंबरप्लेट बसवाव्या लागणार आहेत.

त्या दृष्टीने इतर वाहनचालकांप्रमाणेच पीएमपी प्रशासनाकडूनही याबाबतची कार्यवाही केली जाणार आहे. 31 मार्चपूर्वीच ताफ्यातील 1880 सर्वच्या सर्व बसगाड्यांना या नंबर प्लेट बसवाव्या लागणार आहेत. वाहनांच्या नंबरप्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे व राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून एचएसआरपी बसविणे अत्यावश्यक असून, सर्वोच्च न्यायालयाने तसे निर्देशही दिले आहेत.

### संचलन तूट देण्यास 'पीएमआरडीए'चा नकार

» पीएमआरडीएच्या हद्दीत पीएमपी सेवा देत असल्याने पीएमपीच्या संचलानातील तुटीमध्ये पीएमआरडीने देखील हिस्सा उचलावा असा प्रस्ताव दोन्ही महापालिकांनी पीएमआरडीएला दिला होता. मात्र संचलनातील तुटीचा हिस्सा देण्यास पीएमआरडीने मान्यता दिलेली नाही. त्यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांनाच पीएमपीची संचलनातील 766 कोटी रुपयांची तूट भरून द्यावी लागणार आहे.

### पीएमपीच्या 1880 बसना बसणार एचएसआरपी

» पीएमपीच्या 1880 बस गाड्यांना म्हणजेच ताफ्यातील सर्व बस गाड्यांना आता एचएसआरपी (हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट) बसवण्यात येणार आहेत. यासंदर्भातील हालचाली पीएमपी प्रशासन पातळीवर सुरू झाल्या आहेत.

# रेल्वेकडून चार नव्या मार्गिकांची उभारणी

## कामे युद्धपातळीवर : आष्टी, बीड, परळी, फलटण, कटफळकरांना मिळणार दिलासा

**पुणे | प्रतिनिधी**

रेल्वेच्या पुणे विभागाकडून चार नव्या रेल्वे मार्गिकांची कामे हाती घेण्यात आली आहेत. ही कामे वेगाने सुरू असून, यातील काही टप्पे पूर्ण झाली, तर काही टप्पे नवीन वर्षअखेरीस पूर्ण करण्याचे रेल्वे प्रशासनाचे उद्दिष्ट आहे. या चार मार्गिकांचे काम पूर्ण झाल्यावर आष्टी, बीड, परळी, फलटण, कटफळ भागांतील प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.




महाराष्ट्रातील रेल्वे मार्गिकांचे जाळे विस्तारण्याची मोठी गरज सद्य:स्थितीत निर्माण झाली आहे. त्यादृष्टीने रेल्वे मंत्रालय आणि रेल्वे प्रशासनाकडून पावले उचलली जात आहेत. देशभरात विविध ठिकाणी आवश्यकतेनुसार रेल्वे मार्गांचे दुहेरीकरण आणि नव्या मार्गिका टाकण्याची कामे सुरू आहेत. अशीच कामे रेल्वेच्या पुणे विभागात देखील सुरू आहेत.

या वेळी पुणे विभागात चार नव्या मार्गिकांची कामे सुरू असल्याची माहिती समोर आली. या नव्या मार्गिकांसाठी सुमारे 605 कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, मार्गिकांची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. काही मार्गिकांची कामे नुकतीच पूर्ण झाली असून, उर्वरित कामे लवकरच पूर्ण होतील, असा विश्वास रेल्वेच्या पुणे विभागातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

### मार्गिकांसाठी निधीचे असे होईल वितरण

रेल्वेच्या पुणे विभाग प्रशासनाला या नव्या मार्गिकांसाठी सुमारे 605 कोटींचा निधी मंजूर झाला आहे. यात आष्टी ते विघ्नवाडी, विघ्नवाडी ते बीड आणि बीड ते परळी या रेल्वे मार्गिकांसाठी 275 कोटींचा निधी देण्यात आला. तर फलटण ते कटफळ या नव्या मार्गिकेसाठी 330 कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. निधी उपलब्ध झाल्यामुळे या मार्गिकांची कामे वेगाने पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या मार्गिकांची काम प्रगतिपथावर

बीड ते परळी - 92.65 कि.मी. ही मार्गिका 2025-26 मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

फलटण ते कटफळ - 38 कि.मी. ही मार्गिका मार्च 2027 मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

### पुणे विभागातील नुकत्याच पूर्ण झालेल्या नव्या मार्गिका

» अहिल्यानगर ते बीड -168.6 कि.मी.
» आष्टी ते विघ्नवाडी - 67.11 कि.मी.
» विघ्नवाडी ते बीड- 35.3 कि.मी.

> पुणे विभागात चार नव्या मार्गिकांची कामे हाती घेण्यात आली आहेत. या मार्गिकांमुळे प्रवाशांचा प्रवास वेगवान होणार आहे. 2024-25-26-27 या कालावधीत या मार्गिका पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यातील काही टप्पे पूर्ण झाले असून, उर्वरित कामे वेगाने सुरू आहेत. लवकरच ती पूर्ण होतील.
>
> **- डॉ. मिलिंद हिरवे,**
> **वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक, पुणे विभाग.**

# 'बुलडोझर' कारवाईनंतर चिखलीतील जमिनीचे भाव दुपटीने वाढले

## कारवाई केल्यानंतर एक लाख कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड, लघू उद्योजकांवर आर्थिक संकट

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने चिखली येथे अतिक्रमणविरोधी कारवाई केल्यानंतर येथील जमिनीचे भाव गगनाला भिडले आहेत. येथील एक हजार एकर जागेवर काही बिल्डरांचा डोळा असल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि कारवाईचा फटका बसलेल्या लघू उद्योजकांनी केला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने चिखली येथील अतिक्रमणविरोधी कारवाई बुधवारी (दि. १२) पाचव्या दिवशीदेखील सुरुच ठेवली होती. त्यामुळे येथील परिसर भग्नावस्थेत दिसून येत आहे. भंगार दुकाने, गोदामे, विविध कंपन्यासह आटो मोबाईल इंडस्ट्रीला छोटे-छोटे स्पेअर पार्ट पुरविणाऱ्या लघू उद्योजकांच्या कंपन्यावर बूलडोझर फिरविल्याने एक हजार कोटीची उलाढाल ठप्प झाली आहे.

तर एक लाख कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. अनेक कुटुंबे उध्दवस्त झाली आहेत. या कारवाईमुळे चिखलीतील जमिनीचे भाव गगनाला भिडले असून एक हजार एकर जागेवर काही बिल्डरांनी डोळा ठेवल्याचा आरोप आता जोर धरू लागला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने चिखली, कुदळवाडी, जाधववाडी, हारगुडेवस्ती, पवारवस्ती परिसरात अनधिकृत बांधकामे, व्यावसायिक पत्राशेडवर कारवाई सुरू आहे. क आणि फ क्षेत्रीय कार्यालयाकडून तब्बल पाच हजाराहून अधिक व्यावसायिकांना नोटीस दिल्या होत्या. अतिक्रमण काढून घेण्यासाठी पंधरा दिवसाची मुदतदेखील दिली होती. परंतु, अतिक्रमण न काढल्याने ही कारवाई सुरु झाली आहे.

महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाने शनिवारी (दि. ८) कारवाईला सुरुवात केली. बुधवारीही सुरूच होती. येत्या रविवारपर्यंत (दि. १६) ही कारवाई संपण्याचा अंदाज महापालिका अधिकाऱ्यांनी बोलताना वर्तवला. यादरम्यान सुमारे एक हजार एकर जागा मोकळी केली जाणार आहे.

या अतिक्रमणविरोधी कारवाईने चिखलीची अवस्था भयावह झाली आहे. काही नागरिक सांगत होते की, किल्लारी भूकंपात जिवित आणि वित्तीय हानी झाली. पण, ही कारवाई सगळ्यात मोठी असून चिखलीत वित्तीय हानीमुळे हजारो कुटुंबे रस्त्यावर आली आहेत. सुमारे एक लाख कामगारांवर बेकारीची कु-हाड कोसळली आहे. "या कारवाईमुळे प्रचंड मोठे आर्थिक संकट ओढावले असून भविष्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढून ते कोणत्या टोकाला जाईल, हे सांगता येत नाही," असे काही पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.



### 465 एकर जमीन केली रिकामी

» चिखली, कुदळवाडी परिसरात ३० वर्षांहून अधिक काळ व्यावसायिक कार्यरत आहेत. पण, रोहिंग्या, बांग्लादेशी घुसखोर घुसले म्हणून त्यांच्या नावाखाली पोलीस आणि महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाकडून चिखली, कुदळवाडीतील ४६५ एकर जमीन बुधवारपर्यंत (दि. १२) रिकामी करत १ हजार ५११ बांधकामे, व्यावसायिक पत्राशेड पाडण्यात आली आहेत. कारवाई संपेपर्यंत एक हजार एकर जागा रिकामी करण्यात येणार आहे. त्यामुळे महापालिकेने मनुष्यबळ, यांत्रिक सामुग्री, पोलीस बंदोबस्त लावून खाजगी बिल्डरांसाठी अतिक्रमण कारवाईच्या माध्यमातून जमिनी रिकाम्या करुन देण्याचा ठेका घेतलाय का, असा सवाल स्थानिक नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

### स्थानिकांवर आर्थिक संकट

» चिखली, कुदळवाडीत भंगार दुकाने, गोदामे, लघू उद्योग, विविध दुकाने, आटोमोबाईल वर्कशॉप यासह शेकडो व्यावसायिक दुकाने सुरु होती. सदरील जागा स्थानिक गाववाल्यांच्या होत्या. त्यांनी भाडे कराराने व्यावसायिकांना दिल्या होत्या. दरमहा लाखो रुपये भाडे त्यांना मिळत होते. मात्र, महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी कारवाईमुळे स्थानिक नागरिकांच्या घरावर आर्थिक संकट आले आहे. दरमहा मिळणारे लाखो रुपये भाडे एका क्षणात बंद झाले आहे. त्यामुळे आर्थिक संकटाचा फटका चिखली, कुदळवाडीतील स्थानिकांनाही बसला आहे.

" गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून व्यवसाय करणाऱ्या लघू उद्योजकांना आयुष्यातून उठवण्याचे पाप केले महापालिकेने आहे. लघू उद्योजकांच्या कंपन्यामुळे हवा आणि पाणी, नदी, नाल्यांचे प्रदूषण होत असल्याची खोटी माहिती पसरवून आमची बदनामी करण्यात आली. आमचाच टॅक्स घेवून आमच्या आणि आमच्यावर अवलंबून असलेल्या सहा लाख लोकांचा रोजगार महापालिकेने हिरावून घेतला. आमची बांधकामे अनाधिकृत असतील, पण जागा आमच्या मालकीच्या आहेत. तेथे आम्ही आमच्या मशीन झाकून ठेवू शकतो. बांधकामे सोडून मशीन आणि कच्च्या मालाचे जे नुकसान झाले आहे, त्याची संपूर्ण भरपाई शासनाने आणि महापालिकेने उद्योजकांना द्यावी."

**- संदीप बेलसरे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड लघू उद्योग संघटना**

# रावेत बंधाऱ्यातील गाळ काढण्यासाठी 75 लाखांच्या खर्च स्थायीची मंजुरी

## टप्पा 1 ते 4 मधील गाळ काढण्यासाठी 37 लाखांचा खर्च केला जाणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पवना नदीवरील रावेत येथील बंधाऱ्यातून अशुद्ध उपसा करून निगडी, सेक्टर क्रमांक २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध करून शहराला पाणी पुरविले जाते. पवना नदीतील, इनटेक चॅनेलमधील गाळ व कचरा काढण्यासाठी ३८ लाखांचा खर्च केला जाणार आहे. टप्पा १ ते ४ मधील गाळ काढण्यासाठी ३७ लाखांचा खर्च केला जाणार आहे. असे एकूण ७५ लाख रुपयांच्या खर्चास स्थायी समितीची मान्यता देण्यात आली आहे.

रावेत बंधारा येथील नदीपात्रात मोठ्या प्रमाणात गाळ व कचरा जमा झाला आहे. त्यामुळे त्या ठिकाणी पाणी साचण्याचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे तेथील गाळ व कचरा काढण्यात येणार आहे. रावेत बंधारा आणि इनटेक चॅनेलमधील गाळ व कचरा काढण्यासाठी ५० लाख खर्चाची निविदा काढण्यात आली होती. त्यासाठी तीन निविदा पात्र ठरल्या होत्या. त्यात महाराष्ट्र अंडर वॉटर सर्व्हिसेस या ठेकेदाराची २४ टक्के कमी दराची ३७लाख ९९ हजार ९६२ रुपये दराची निविदा स्वीकृत करण्यात आली आहे.

येथील पंपिंग स्टेशनमधील टप्पा क्रमांक १ ते ४ मधील गाळ काढण्यासाठी ४८ लाख ८१ हजार २५० रुपये खर्चाची निविदा काढण्यात आली होती. त्या कामासाठीही महाराष्ट्र अंडर वॉटर सर्व्हिसेसची २४ टक्के कमी दराची ३७ लाख ९ हजार ७५० रुपये दराची निविदा स्वीकृत करण्यात आली आहे. या दोन्ही कामाची मुदत दीड वर्षे आहे. या खर्चास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीची मान्यता दिली आहे.



### पंपिंग स्टेशनमधील मशिनरी दुरुस्तीसाठी 33 लाख

» रावेत येथील बंधाऱ्यातून अशुद्ध उपसा केंद्रातील टप्पा एक व दोनमधील पंपिंग स्टेशनची मशिनरी व विद्युत व्यवस्थेची वार्षिक देखभाल व दुरुस्तीचे कामासाठी ३३ लाख ३७ हजार ७१८ रुपये खर्च येणार आहे. या कामासाठी रिअल इलेक्ट्रीकल्स या ठेकेदाराची १५.३० टक्के कमी दराची निविदा स्वीकृत करण्यात आली आहे. त्यास आयुक्तांनी स्थायी समितीची मान्यता दिली आहे.

# जानाई शिरसाईचा फायदा कोणाला?

## पुरंदर तालुक्यातील बळीराजाचा सवाल : आजपर्यंत अपेक्षित पाणी मिळालेच नाही

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य शासनाने पुरंदर, दौंड आणि बारामती तालुक्यातील शेतीच्या पाण्यासाठी तयार केलेल्या जानाई शिरसाई योजनेसाठी नुकतेच 438 कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यातून योजनेतील वितरीकांना बंद पाइपलाइनमधून पाणी देण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे; परंतु योजना सुरू झाल्यापासून आजपर्यंत पुरंदरच्या वाट्याला अपेक्षित पाणी मिळालेच नाही. शासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे धरणातून पाणी सोडले जाते खरे, मात्र पुरंदरच्या शेतकऱ्यांना पाण्याचा लाभच मिळत नसेल आणि दुष्काळाला कायमच तोंड द्यावे लागत असेल तर या योजनेचा फायदा कोणासाठी, हा प्रश्न आता पुरंदरचे शेतकरी उपस्थित करीत आहेत.



### वीर धरणातील पाण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष ....

» गुंजवणी, भाटघर, वीर नदीतून नीरा नदीत पाणी वाहत जाते. तर नीरा नदीतून दरवर्षी तब्बल 100 टीएमसी पाणी कर्नाटकमध्ये जाते. मात्र याकडे शासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष आहे. त्याऐवजी तेच पाणी उचलून जेजुरीच्या नाझरे धरणात सोडल्यास तेथून पुरंदरच्या पूर्व भागातील दुष्काळी गावांसह बारामती तालुक्यातील दुष्काळी भागाला देणे शक्य आहे. त्यातून परिसरात मोठमोठे बंधारे बांधता येईल आणि बंधारे, तलाव मधून शेती, उद्योग आणि पिण्याच्या पाण्याचाही कायमचा प्रश्न मिटण्यास मदत होईल. त्यामुळे शासनाने जानाई शिरसाई योजनेसाठी मंजूर केलेले 438 कोटी नीरा नदीवरील प्रकल्पासाठी द्यावेत.

खडकवासला, वरसगाव, पानशेत आणि टेमघर ही धरण साखळी शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळावे यासाठी उभारण्यात आली होती. मात्र मागील 10 वर्षांत योजनेला खडकवासला धरणातून कधीच पाऊण टीएमसीपेक्षा अधिक पाणी उपलब्ध झालेले नाही. जानाई शिरसाई उपसा ही सिंचन योजना खडकवासला धरण साखळीतून मंजूर असलेल्या 4 टीएमसी पाण्यावर अवलंबून आहे. तर खडकवासला धरणातून पुणे शहराला पिण्यासाठी पाणीपुरवठा केला जातो.पुणे शहराची दिवसेंदिवस होणारी बेसुमार वाढ पाहता भविष्यात जानाई शिरसाई योजनेला पाणी मिळणे आणखी दुरापास्त होणार आहे.

### मग शेतीला कधी पाणी मिळणार

» खडकवासला, वरसगाव, पानशेत आणि टेमघर या चार धरणातील पाणीसाठा क्षमता 29 टीएमसी असून यापैकी तब्बल 21 टीएमसी केवळ पुण्याला पिण्यासाठी दिले जाते. तसेच पुढील दहा वर्षांचा विचार केल्यास लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढणार असून संपूर्ण 29 टीएमसी पाणी पुण्यालाच लागणार आहे. मग शेतीला कधी पाणी मिळणार ?

### ...तर योजनांवर कोट्यवधींची खैरात कोणासाठी ?

» औद्योगिकीरण सर्वत्र झपाट्याने वाढत असून पुरंदरला आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प करण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे पुरंदर आणि परिसरात मोठमोठ्या कंपन्या निर्माण होणार असल्याने त्या दृष्टीने उद्योगाला पाणी द्यावे लागणार. मग संपूर्ण पाणी पिण्यास आणि उद्योगाला दिल्यास शेतीसाठी पाणी कोठून आणणार? मग शेतीलाच पाणी शिल्लक राहणार नसेल तर योजनांवर कोट्यवधीं रुपयांची खैरात कोणासाठी ?

जसजशी पुण्याची वाढ होत गेली तसा शेतीला मिळणारा पाण्याचा साठा कमी कमी होत गेला. खडकवासला, वरसगाव, पानशेत आणि टेमघर या चार धरणांची पाणीसाठा क्षमता 29 टीएमसी आहे. पुण्याला 11.5 टीएमसी पाणी पिण्यास मंजूर आहे; मात्र सध्या पुण्याला 20.78 टीएमसी पाणी दिले जाते. याशिवाय पाण्याची गळती मोठ्या प्रमाणात होते. त्यात आता महापालिकेने आपली हद्दवाढ करून 34 गावे नव्याने महापालिकेमध्ये समाविष्ट केलेली आहेत. याचा अर्थ भविष्यात शेतीला दिल्या जाणाऱ्या पाण्यावर मोठ्या प्रमाणावर गंडांतर येणार हे निश्चित.

# खेड टँकरमुक्त करण्याचा प्रयत्न; जलजीवन मिशन अंतर्गत 158 पैकी 73 गावांच्या योजना पुर्णत्वात

## दुष्काळग्रस्त गावातील पाणी योजना पूर्ण करुन ती गावे टँकरमुक्त करण्याचा प्रयत्न सुरु आहे, अशी माहिती पाणीपुरवठा विभागाच्या उप अभियंता के. एन. खरात, शाखा अभियंता आनंद जकिणकर यांनी दिली.

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्यात जलजीवन मिशन अंतर्गत 158 गावांत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजना पैकी 73 गावांतील योजना पूर्ण झाल्या असून 21 गावांतील पाणी योजना पूर्णत्वाकडे आहेत. दुष्काळग्रस्त गावातील पाणी योजना पूर्ण करून ती गावे टँकरमुक्त करण्याचा प्रयत्न सुरू आहे, अशी माहिती पाणीपुरवठा विभागाच्या उप अभियंता के. एन. खरात, शाखा अभियंता आनंद जकिणकर यांनी दिली.



खेड तालुक्यात अनेक गावांमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत पाणी योजना झाल्या आहेत होत आहेत. टँकरमुक्त तालुका करण्यासाठी माजी मांदार दिलीप मोहिते पाटील यांनी 188 गावांचा प्रस्ताव शासनाला पाठवला होता. त्यानुसार तालुक्यात 158 गावांमध्ये जलजीवन मिशनच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा निधी मिळाला. या योजनाअंतर्गत अनेक गावाच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. योजना पूर्ण झालेल्या गावाचा पाणीप्रश्न सुटला आहे. खेड तालुक्यात अनेक गावांमध्ये पाणी योजना योजनांसाठी वीज उपलब्ध नाही.

महावितरण कंपनीच्या आडमुठेपणामुळे योजना बंद आहेत. टंचाईग्रस्त गावांमधील पाणी योजना सुरू राहण्यासाठी महावितरण कंपनीने फेब्रुवारी ते जूनपर्यंत वीजजोडणी करावी जेणेकरून गावातील पाणी योजना उन्हाळात सुरू राहतील नागरिकांची पायपीट थांबेल. विजेच्या पुरवठ्या अभावी योजना बंद असल्याने नागरिकांचे मात्र पाण्यासाठी उन्हाळ्यात हाल होणार आहेत.

### सोलर योजनेसाठी 69 गावांचा प्रस्ताव

» पाणी योजनांना लागणारी वीज उपलब्ध व्हावी यासाठी शासनाकडे पाणीपुरवठा विभागाने सोलर योजनेसाठी 69 गावांचे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. तालुक्यातील साकुर्डी, गाडकवाडी, चिंचबाईवाडी, आणि जऊळके बुद्रुक या गावातील जलजीवन मिशन पाणी पुरवठा योजना सोलरवर सुरु झाल्या असून हि गावे टँकरमुक्त झाली आहेत. वाशेरे गावातील पाणी योजना सुरु झाली आहे मात्र वीज वितरण विभागाचे काम अपूर्ण असल्याने अडथळे येत आहेत.

> खेड तालुक्यात 158 गावात जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजना सुरू आहेत त्यापैकी 73 गावांतील पाणी योजना पूर्ण झाल्या आहेत तर 21 गावांच्या योजना पूर्णत्वाकडे आहेत. अनेक गावांमध्ये वीजपुरवठा मिळत नसल्याने पाणी योजनेला अडथळे येत आहेत. वीज बिलाचा प्रश्न असला तरी मार्च ते जून पर्यत महावितरण कंपनीने वीजपुरवठा केला तर काही गावे टँकरमुक्त होतील. तालुक्यांतील 4 गावांमध्ये सोलर सिस्टीम बसविल्याने पाणीपुरवठा सुरळीत होत आहे तर 69 गावांचे सोलर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आले आहेत.
>
> - के. एन. खरात, उप अभियंता, खेड पंचायत समिती